# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४७व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१९ (बुधवार)**
**वेळ : दुपारी ४.०० वाजता**
**स्थळ : मा.मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष,**
**विधानमंडळ सचिवालय,**
**विधानभवन,**
**मुंबई — ४०० ०३२.**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. देवेंद्र फडणवीस<br>माननीय मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| श्री. प्रकाश मेहता<br>गृहनिर्माण मंत्री | - | सदस्य |
| श्री. यशवंत जाधव<br>अध्यक्ष, स्थायी समिती व<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. मनोज कोटक<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. रवी राजा<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. संजयकुमार<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |

श्री. लोकेशचंद्र - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक, सिडको

श्री. आर.ए.राजीव - सदस्य-सचिव
महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**<u>निमंत्रित :</u>**

श्रीमती मंजुषा जाधव
अध्यक्षा,
ठाणे जिल्हा परिषद

श्रीमती डिम्पल मेहता
महापौर,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

श्रीमती पंचम ओमी कलानी
महापौर,
उल्हासनगर महानगरपालिका

श्रीमती प्रितम पाटील
नगराध्यक्षा,
पेण नगरपरिषद

श्रीमती सायली म्हात्रे
नगराध्यक्षा,
उरण नगरपरिषद

श्रीमती सुमन औसरमल
नगराध्यक्षा,
खोपोली नगरपरिषद

श्री. राधेश्याम मोपलवार
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाने श्री.अरुण बोंगिरवार, शासनाचे माजी मुख्य सचिव व सदस्य, प्राधिकरण यांचे दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून त्यांना श्रद्धांजली वाहीली. त्यानंतर श्री. बोंगिरवार यांच्या निधनाबद्दलच्या शोक ठरावास (जोडपत्र) प्राधिकरणाने मंजूरी दिली.

मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले. तसेच सर्व सदस्यांचे व निमंत्रितांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर महानगर आयुक्त यांनी श्री.यशवंत जाधव, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.मनोज कोटक, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका व श्री.रवी राजा, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्राधिकरणाचे नवे नामनिर्देशित सदस्य म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१ :</u>** **<u>दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१४६व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करताना, महानगर आयुक्त यांनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४६व्या बैठकीच्या कार्यवृत्तात खालील सुधारणा/दुरुस्त्या करण्याबाबत सुचविले :-

**<u>बाब क्र.६</u>** विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता प्रकल्प अंमलबजावणी घटकासाठी आवश्यक पदांसाठी ठराव क्र.१४७४ अन्वये मंजूरी दिली असून, त्यामध्ये इतर कर्मचारीवर्ग यामधील अनु.क्र.११ करीता सहा.मुख्य लेखा अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु.१४,६००-३९,१०० ग्रे.पे. रु.६,६०० अशी दर्शविली असून, त्या ऐवजी वेतनश्रेणी रु.१५,६००-३९,१०० ग्रे.पे.रु.६,६०० अशी सुधारणा करण्यास कृपया मान्यता मिळावी.

**निर्णय : उपरोक्त सुधारीत वेतनश्रेणीस प्राधिकरणाने मंजूरी दिली.**

**<u>बाब क्र.९</u>** मुंबई मेट्रोच्या संचालन व देखभालीसाठी मुंबई मेट्रो संचालन महामंडळ मर्यादित असे एक स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यास प्राधिकरणाने ठराव क्र.१४७७ अन्वये मंजूरी दिली आहे. परंतु, हे महामंडळ संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रोचे देखभाल करणार असल्याने त्याचे नाव महा मुंबई मेट्रो ($M^3$) संचालन महामंडळ मर्यादित स्थापन करण्याचा प्रस्ताव व महामंडळासाठी आवश्यक MOA व AOA शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. शासनाच्या मान्यतेनंतर कंपनी कायदा, २०१३ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

तसेच मेट्रो अंमलबजावणी पथकासाठी तांत्रिक व कार्यकारी पदे निर्माण करताना ठराव क्र.१४७७ मध्ये मेट्रो लाईन २-अे व ७ करीता कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदाची वेतनश्रेणी रु.९,३००-३४,८०० ग्रे.पे.रु.४,४०० अशी दर्शविली असून, त्यामध्ये ग्रे.पे.रु.४,४०० ऐवजी रु.४,३०० अशी सुधारणा करण्यास कृपया मान्यता मिळावी.

**निर्णय : उपरोक्त महामंडळाच्या नावातील बदलास व सुधारीत वेतनश्रेणीस प्राधिकरणाने मंजूरी दिली.**

उपरोक्त सुधारणा/दुरुस्तीसह कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१४६व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : प्राधिकरणाचा सन २०१९-२० चा वार्षिक कार्ये कार्यक्रम**

३.१. महानगर आयुक्तांनी सन २०१९-२० च्या वार्षिक कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती सांगितली. तसेच या वर्षात राबविण्यात येणाऱ्या महत्वपूर्ण योजना/प्रकल्पांची माहिती थोडक्यात सांगितली. प्राधिकरण पुढील आर्थिक वर्षात एकूण ७४ प्रकल्प/योजना राबविणार आहे. सन २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१६२९४.४० कोटी इतका खर्च होणार आहे. या वर्षात राबविण्यात येणाऱ्या महत्वपूर्ण योजनांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अनु. क्र. | योजनेचे नाव | रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| १. | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प – वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (MRTS) | ९८.०० |
| २. | मोनो रेल प्रकल्प | १५०.०० |
| ३. | एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाचे अंतर्गत (UMMTA) ITS आणि इतर प्रकल्प | २७.०० |
| ४. | मेट्रो प्रकल्प मार्ग २ अ : दहिसर-चारकोप-मानखुर्द (दहिसर ते डी.एन.नगर अंधेरी) | १८९५.७० |
| ५. | मेट्रो प्रकल्प २ ब : डी. एन. नगर ते मंडाळे | ५१९.६० |
| ६. | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प – कुलाबा-वांद्रे-सीप्झ (MMRC) | ६५०.०० |
| ७. | मेट्रो प्रकल्प ४ : वडाळा - घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली | १३३७.०० |
| ८. | मेट्रो प्रकल्प ५ : ठाणे - भिवंडी – कल्याण | १५०.०० |
| ९. | मेट्रो प्रकल्प ६ : स्वामी समर्थ नगर - JVLR - सीप्झ- कांजुरमार्ग - विक्रोळी EEH | ८००.०० |
| १० | मेट्रो प्रकल्प ७ : अंधेरी – पूर्व ते दहिसर – पूर्व | १९२१.२० |
| ११. | मेट्रो प्रकल्प १० : गायमुख शिवाजी चौक (मिरा रोड) | ५.०० |
| १२. | मेट्रो प्रकल्प ११ : वडाळा- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | ५.०० |
| १३. | मेट्रो प्रकल्प १२: कल्याण – डोंबिवली – तळोजा | ५.०० |
| १४. | मेट्रो भवन | १००.०० |
| १५. | पायाभूत सोयीसुविधासह मुंबई महानगर क्षेत्रात भाडेतत्वावर निवासस्थाने बांधणे | ५.०० |
| १६. | वांद्रे-कुर्ला संकुलात सुधारणा व नागरी सुविधा | ५०.०० |
| १७. | ओशिवरा जिल्हा केंद्राचे विकसन | १६.०० |
| १८. | मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प | ८७.६० |
| १९. | विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविणे (भू-संपादनासह) | ८००.०० |
| २०. | मिठी नदी विकास | २०.०० |
| २१. | वडाळा ट्रक टर्मिनल | १०.४० |

| | | |
|---|---|---|
| २२. | मुंबई पारबंदर छन्नमार्ग (शिवडी ते न्हावा शेवा) | ३०००.०० |
| २३. | पुनर्वसन व पुनर्वसाहत सुविधा | १३.०५ |
| २४. | वरळी ते शिवडी उन्नत मार्ग | ५०.०० |
| २५. | विरार-अलिबाग बहुउद्देशिय छन्नमार्गाचा विकास | २२५०.०० |
| २६. | मुंबई महानगर प्रदेशातील बाहय रस्ते सुधारणा | १४३.०० |
| २७. | सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता – विस्तारीत तसेच वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत उन्नत मार्ग बांधणे | १००.०० |
| २८. | नवीन विकास केंद्रात पायाभूत सुविधा (कल्याण व भिवंडी) | ५.०० |
| २९. | पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर - पूर्व येथील उन्नत मार्ग सुधारणा | ७५.०० |
| ३०. | पुर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाची देखभाल व दुरुस्ती | ५०.०० |
| ३१. | वडाळा भारवाहक तळ येथील इमारतीचे बांधकाम | ५०.०० |
| ३२. | कलीना विद्यापीठात पायाभूत सुविधा पुरविणे | ५४.०० |
| ३३. | इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक बांधणे | १६०.०० |
| ३४. | स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणे | ५०.०० |
| ३५. | प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास - सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना | ७०४.२० |
| ३६. | स्मार्ट सिटी | ५.०० |
| ३७. | मुंबई नागरी परिवहन प्रकल्प | ५००.१० |
| ३८. | कर्ज वितरण, अनुदाने आणी अभ्यास योजना व इतर संकीर्ण प्रकल्प | ४३२.५५ |
| | एकूण :- | **१६२९४.४०** |

३.२. त्यानंतर, वार्षिक कार्यक्रमांना मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१४९२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** टिप्पणीसह सादर केलेल्या २०१९-२०२० सालचा वार्षिक कार्ये कार्यक्रम व २०१९-२०२० सालाचा मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना-फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम संमत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : प्राधिकरणाचा सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक**

४.१. महानगर आयुक्तांनी प्राधिकरणाचा सन २०१९-२० चा अर्थसंकल्प सादर केला. प्राधिकरणाचे २०१८-१९ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१९-२० चे वार्षिक अंदाजपत्रकाविषयी थोडक्यात माहिती दिली.

४.२. सन २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१३३३४.९५ कोटी इतकी रक्कम जमा होईल असे अपेक्षित आहे. यात प्रामुख्याने जमिन विक्रीपोटी रु.३६६७.३५ कोटी, विकास हक्क हस्तांतरण रु.४६६.४० कोटी, नागरी परिवहन निधी रु.२०८५.०० कोटी, आंतरराष्ट्रीय संस्थांकडून कर्ज रु.४५००.०० कोटी, ठेवीवरील व्याज रु.६००.०० कोटी, महानगरपालिका/नगरपालिकांकडून कर्ज परतफेड व त्यावरील व्याज रु.१८०.४५ कोटी, वसई-विरार पाणीपुरवठा योजनेकरीता अंशदान रु.१०.०० कोटी, विकास आकार रु.१३.०० कोटी, संकीर्ण जमा (निविदा प्रपत्राची विक्री व जमिन भाडेपट्टी आकारावरील व्याज) रु.५६.४५ कोटी, मोनो रेल मधून मिळणारे प्रवासी भाडे रु.३६.०० कोटी व इतर जमा रु.१७२०.३० कोटी यांचा समावेश आहे. सन २०१८-१९ चे अर्थसंकल्प सादर करताना एकूण रु.६५०१.३० कोटी इतकी रक्कम जमा होईल असे अपेक्षित होते. माहे डिसेंबर, २०१८ अखेरपर्यंत प्राप्त झालेल्या रक्कमांचा विचार करता सुधारीत अर्थसंकल्पात जमा रक्कमा रु.४६९५.२५ कोटीची तरतूद केली आहे.

४.३. सन २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१६९०९.१० कोटी इतकी रक्कम खर्च होईल असे अपेक्षित आहे. यात प्रामुख्याने मेट्रोसाठी सुमारे रु.७३८६.५० कोटी रुपयांची तरतूद, मुंबई पारबंदर छन्नमार्ग (MTHL) शिवडी ते न्हावाशेवा जलसेतू रु.३०००.०० कोटी, मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प रु.५००.१० कोटी, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प व विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (भूसंपादनासह)- रु.८८७.६० कोटी, मोनो रेल्वेसाठी रु.१५०.०० कोटी, विरार-अलिबाग बहुउद्देशिय छन्नमार्गाचा विकास रु.२२५०.०० कोटी, मुंबई महानगर प्रदेशातील बाह्य रस्ते सुधारणा रु.१४३.०० कोटी, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे कुर्ला (सी.एस.टी.रोड) ते वाकोला पुलापर्यंत विस्तारीकरण करणे तसेच वांद्रे कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत उन्नत मार्ग बांधणे रु.१००.०० कोटी, पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शंन, घाटकोपर (पुर्व) येथील उन्नतमार्ग सुधारणा करणे रु.७५.०० कोटी, कलिना विद्यापीठात पायाभूत सुविधा पुरविणे रु.५४.०० कोटी, पुर्व व पश्चिम द्रुतगती मार्गाची देखभाल व दुरुस्ती रु.५०.०० कोटी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथे भव्य स्मारक रु.१६०.०० कोटी, स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणे रु.५०.०० कोटी, प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास-सुर्या प्रकल्प, काळु प्रकल्प रु.७०४.२० कोटी, होमगार्ड इमारत बांधकाम रु.१०.०० कोटी, मुंबई महानगर क्षेत्रात निवासस्थाने बांधणे रु.५.०० कोटी, मार्वे-भाईंदर-घोडबंदर सागरी किनारा रस्त्याचे बांधकाम रु.३.०० कोटी, अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील नरसी मेहता रस्त्यावर जागृती नगर मेट्रो स्थानकाखाली पुलाचे बांधकाम रु.१४.००

कोटी, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता व वांद्रे-कुर्ला संकुल यांना जोडणारा ३० मी. रुंद डी.पी. रस्ता रु.१०.०० कोटी, स्मार्ट सिटी/स्मार्ट स्ट्रीट लाईट योजना रु.५.०० कोटी व इतर संकीर्ण प्रकल्पावर रु.१३५१.७० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

४.४. सर्वेक्षण व अभ्यासासाठी रु.४६.१० कोटी, अनुदाने रु.२६४.८५ कोटी, स्थानिक संस्थांना कर्जे/ मेगासिटी कर्जाची परतफेड रु.३१०.५० कोटी, प्रशासकीय खर्च व डेड स्टॉक या करीता रु.३७४.६० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. सन २०१८-१९ चे अर्थसंकल्प तयार करताना प्रकल्प तसेच विविध लेखाशिर्षापोटी रु.१२१५६.९५ कोटी खर्च होतील असे अपेक्षित होते. माहे डिसेंबर, २०१८ अखेरपर्यंत झालेल्या खर्चाचा तसेच जानेवारी, २०१९ ते मार्च, २०१९ या कालावधीत होणाऱ्या अपेक्षित खर्चाचा विचार करता सुधारीत अर्थसंकल्पात एकूण खर्चापोटी रु.८३८४.४५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

४.५. वरील बाबी विचारात घेता सन २०१९-२० या वर्षात रु.१६९०९.१० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. प्राधिकरणाचा सन २०१९-२० मधील उत्पन्न रु.१३३३४.९५ कोटी व खर्च रु.१६९०९.१० कोटीचा विचार करता या वर्षामध्ये रु.३५७४.१५ कोटीची तूट दिसून येत आहे व ही तूट प्राधिकरणाकडे असलेल्या निधीतून भागविण्यात येईल.

४.६. त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीसह प्रस्तावित केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार करुन मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१४९३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) अन्वयें प्राधिकरणाच्या अंदाजित जमा रु.१३३३४.९५ कोटी व खर्च रु.१६९०९.१० कोटी दर्शविणारा २०१९-२०२० सालाचा अर्थसंकल्प आणि २०१८-२०१९ सालचे सुधारीत अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी अंदाजित जमा रु.२४८.६२ कोटी व खर्च रु.१०.०० कोटी आणि महानगर योजना-फिरता निधी यांचे अंदाजित जमा रु.२५१३.३८ कोटी व खर्च रु.४५.७२ कोटी दर्शविणारे सन २०१९-२०२० चे अर्थसंकल्पीय अंदाज व २०१८-२०१९ चे सुधारीत अंदाज यांस मंजूरी देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे योजना, सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम अहवाल आणि मंजूर अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या प्रत्येकी रु.१ कोटी पेक्षा कमी असलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा/खर्च करण्याचा अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुं. म. प्र. वि. प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत**

५.१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ च्या अहवाल खंड-१ मधील वेतनश्रेणीबाबतच्या व आनुषंगिक शिफारशी स्विकृत करण्यात आल्या आहेत. समितीच्या शिफारशी व त्यावर शासनाने घेतलेले निर्णय याबाबतचा ज्या प्रकरणी सविस्तर आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे, त्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येणार असल्याचे नमूद केले होते. त्यानुसार वित्त विभाग अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासुन ७व्या वेतन आयोगाची सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आली आहे.

५.२. राज्य शासनाने ६व्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केल्यानंतर सदरहू शिफारशी योग्य फेरफारांसह प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारीवृंदास लागू करण्यासही मान्यता देण्यात आली होती.

५.३. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ५० मधील तरतुदी व कलम ११ च्या उपकलम (२) अनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवा व शर्ती) विनियम, १९७७ मधील विनियम ३ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी लागू केले जाणारे वेतन व भत्ते, प्राधिकरणाने वेगळे नियम/विनियम केलेले नसल्याने, प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना जसेच्या तसे (Mutatis Mutandis) (निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी व उपदान वगळून) देय ठरतात. त्याचप्रमाणे उपरोक्त विनियमांपैकी विनियम ५ द्वारे अशा प्रकरणी रीतसर कार्यपध्दती अनुसरुन निर्णय घेण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना जरी प्रदान करण्यात आले असले तरी ७व्या वेतन आयोग प्राधिकरणातील कर्मचारीवृंदास लागू करणे हा धोरणात्मक निर्णय असल्याने ही

बाब मान्यतेसाठी प्राधिकरणापुढे सादर करण्यात आली आहे.  शासनाचे वित्त विभाग अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासुन सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आली असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचारीवृंदासही ७व्या वेतन आयोगाची सुधारीत वेतन संरचना लागु करण्यात यावी असे प्रस्तावित आहे.  तसेच प्राधिकरणातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ७वा वेतन आयोग प्रत्यक्ष लागु केल्यानंतर विशेष वेतन/भत्ते देणेबाबत समिती गठीत करुन योग्य तो निर्णय घेण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता मिळावी.

५.४.  चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१४९४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातील अ, ब, क व ड या संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाचे वित्त विभाग अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ अनुसार दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून ७व्या वेतन आयोगाची सुधारीत वेतन संरचना लागू करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, प्राधिकरणातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ७वा वेतन आयोग प्रत्यक्ष लागु केल्यानंतर विशेष वेतन/भत्ते देणेबाबत समिती गठीत करुन योग्य तो निर्णय घेण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना आजीवन वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

६.१.  सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना विविध रुग्णालयांबरोबर सामंजस्य कॅशलेस सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु, सेवानिवृत्त

कर्मचाऱ्यांसाठी कोणतीही म्हणजेच निवृत्तीवेतन, मेडिक्लेम अशा सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यामुळे सदर बाबींचा विचार करुन तत्कालीन मुख्यमंत्री व अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३२व्या बैठकीमध्ये प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना आजीवन वैद्यकीय सुविधा देण्याच्यादृष्टीने एखादी चांगली योजना सादर करावी असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीमध्ये न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनीमार्फत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना मेडिक्लेम योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित केले होते. त्यावर प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांची एक सदस्य समिती गठीत करण्यात आली. त्याप्रमाणे प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आजीवन वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे सादर केला :-

> "प्राधिकरणाने प्रस्तावित केलेली आजीवन वैद्यकीय सेवा योजना राबवावयाची झाल्यास प्राधिकरणावर कायमस्वरुपी दायित्व (Liability) येणार आहे. ही बाब विचारात घेऊन, शासनाकडील आरोग्य विमाछत्र योजना, प्राधिकरणाने प्रस्तावित केलेली आजीवन वैद्यकीय सेवा योजना व सिडकोची वैद्यकीय सेवा योजना तसेच सिडकोकडून यासाठी भरण्यात येणारा प्रिमीयम या बाबी प्राधिकरणाच्या सभेत सादर करुन त्यावर प्राधिकरणाच्या स्तरावर सुयोग्य निर्णय घ्यावा. तसेच सदर योजनेमुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भार/दायित्व शासनावर येणार नाही, याची दक्षता प्राधिकरणाने घ्यावी."

६.२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सिडकोमध्ये मेडिक्लेम सुविधा ही सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचारी व त्यांचे पती/पत्नी व अवलंबित दोन मुले, आई-वडील असे कुटुंबातील ६ जणांना मेडिक्लेमचा फायदा देण्यात येतो. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना पेन्शन सुविधा अनुज्ञेय असल्याने मेडिक्लेम सुविधेसाठीचा प्रिमीयम कर्मचारी स्वत: अदा करतो. प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर कोणताही आर्थिक स्त्रोत उपलब्ध नाही. सबब, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर आजीवन मेडिक्लेम सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे. प्राधिकरणामधील सेवानिवृत्त कर्मचारी यांना मेडिक्लेम पॉलिसीद्वारे आजीवन वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिल्यास शासनावर कोणताही प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या आर्थिक भार पडणार नाही. तरी सदर खर्च भागविण्यास प्राधिकरण सक्षम आहे. त्याप्रमाणे प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना

आजीवन वैद्यकीय सेवा पुरविण्याकरीता इन्शुरन्स कंपनीकडून १६० सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांची पती/पत्नी यांना रु.५ लाख रक्कमेची मेडिक्लेम पॉलिसी घेण्यात येईल. त्याबाबत मे.I.R.M. इन्शुरन्स ब्रोकर्स प्रा.लि. यांचेकडून उपलब्ध झालेल्या दरपत्रकानुसार विमा हप्ता रु.४१ लाख + GST इतका अंदाजित असून, वार्षिक प्रती कर्मचारी व त्यांची पती/पत्नी यांचेसाठी एकूण रु.२५,६२५/- + GST इतका प्रिमीयम देय होणार आहे. प्राधिकरणाने भरावयाचा सदर प्रिमीयम हा त्यांच्या सेवानिवृत्त वयोवृध्द कर्मचारी तथा त्यांच्या वयोवृध्द पती/पत्नीसाठी असून, तुलनात्मकदृष्ट्या ते सिडकोपेक्षा कमी आहे. प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्यास/घटल्यास प्रिमीयम कमी/जास्त होणार आहे. दरवर्षी माहे जानेवारीमध्ये आढावा घेऊन सदर ग्रुप मेडिक्लेम पॉलिसीचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांची पती/पत्नी यांस प्राधिकरणाकडून सदर ग्रुप मेडिक्लेम पॉलिसीचा आजीवन लाभ मिळत राहील.

६.३. तरी प्राधिकरणास विनंती की, प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीनंतर आर्थिक स्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे, सेवानिवृत्तीनंतर वैद्यकीय उपचाराकरीता उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे T.P.A. (Third Party Administrator) मार्फत सर्वात कमी प्रिमीयम असलेल्या इन्शुरन्स कंपनीची १६० कर्मचारी व पती/पत्नी यांचेसाठी रु.५ लाखाची ग्रुप मेडिक्लेम पॉलिसी लागू करण्याच्या प्रस्तावास कृपया मान्यता द्यावी.

६.४. चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजुर केला:-

**ठराव क्र.१४९५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम-११ चे उपकलम (२) नुसार बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी व त्यांचे पती/पत्नी यांना सेवानिवृत्तीनंतर आजीवन वैद्यकीय सुविधा अंमलात आणण्याकरीता इन्शुरन्स कंपनीकडून रु.५ लाख रक्कमेची ग्रुप मेडिक्लेम पॉलिसी लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या पती/पत्नी करीता आजीवन वैद्यकीय सुविधांसंबंधी विमा कंपनीची निवड करण्यासाठी निविदा मागविण्याचे तथा स्विकृत करण्याचे सर्वाधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** आजीवन वैद्यकीय सुविधेचा लाभ प्राधिकरणातून नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना अथवा किमान २० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या स्वेच्छा सेवानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यास लागू राहील.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनियम, १९७५ मध्ये बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे ५-अ म्हणून समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूकीचा अहवाल — दिनांक ०१ जुलै, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८**

७.१. उपरोक्त अहवालाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ नुसार विविध संस्थांमध्ये माहे दिनांक १ जुलै, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत गुंतविलेल्या अतिरिक्त निधीचा अहवाल प्राधिकरणाच्या माहितीकरीता सादर करण्यात आला आहे. या कालावधीत सरासरी ८.२६% दराने गुंतवणूक करण्यात आली.

७.२. महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने दिनांक १ जुलै, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ दरम्यान केलेल्या गुंतवणूक अहवालासंबंधी माहिती दिली. त्यानंतर दिनांक १ जुलै, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.८ : अंबरनाथ-कुळगाव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.१५.५ व १९.८ मध्ये 'Refuge Area' बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये करावयाच्या फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत.**

८.१. सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. १५.५ व १९.८ मध्ये 'Refuge Area' च्या तरतुदीबाबत शासनाच्या क्र.टिपीएस-

१२१७/३००८/ प्र.क्र.१७६/१८/नवि-१२, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ निदेशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावाविषयी प्राधिकरणाने योग्य निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. विषयांकित प्रकरणी शासनाच्या क्र.टिपीएस-१२१७/३००८/प्र.क्र.१७६/१८/नवि-१२, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ निदेशाप्रमाणे अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालील सुधारणा प्रस्तावित आहे :-

| **अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार 'Refuge Area' बाबत तरतूद** | **शासनाच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ निदेशानुसार प्रस्तावित फेरबदल** |
|---|---|
| **विनियम क्र. १५.५(d)** fire escape passages | **विनियम क्र. १५.५(d)** fire escape passages, Refuge areas for high rise buildings |
| **विनियम क्र. १९.८ Refuge Area**<br>For all buildings exceeding 15m in height, excepting multi family dwellings, refuge area shall be provided on the external walls as cantilever projection or in any other manner. | **विनियम क्र. १९.८ Refuge Area**<br>For all buildings exceeding 15m in height but upto 24m., excepting multifamily dwellings, refuge area shall be provided on the periphery of the floor or preferably on a cantilever projection and open to air at least on one side protected with suitable railings. For buildings more than 24m in height, refuge area of 15 sq.m. or an area equivalent to 0.3 sq.m. per person to accommodate the occupants of two consecutive floors whichever is higher shall be provided as under :<br>a) For floors above 24m and upto 39m – One refuge area on the floor immediately above 24m.<br>b) For floors above 39m - One refuge area on the floor immediately above 39m and so on after every 15 m. Refuge area provided on excess of the requirements shall be counted towards FSI.<br>**Note:** Residential flats on multi-storeyed buildings with balcony need not be provided with refuge area. However, flats without balcony or with enclosed balconies shall be provided with refuge area as given above. All refuge areas shall be accessible from common passages/staircases. |

८.२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, शासनाने असे निदेश दिले आहेत की, प्राधिकरणाने अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये संदर्भित फेरबदलासंदर्भात उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन, प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करावा तसेच सदरहू निदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत उक्त फेरबदल प्रस्तावा संदर्भातील सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

८.३. चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला:-

**ठराव क्र.१४९६ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उप कलम १ चे पोट कलम (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने शासन निदेश क्र.टिपीएस-१२१७/३००८/प्र.क्र.१७६/१८/नवि-१२, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ यास अनुसरून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम क्र.१५.५ व १९.८ मध्ये वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करण्यासाठी मान्यता देत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की**, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वरीलप्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्यासंदर्भात अधिनियमातील सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून, जसे जनतेकडून सूचना/हरकती मागविणेसाठी नोटीस प्रसिध्द करणे, शासनास सदर फेरबदल प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करणे यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे. तसेच, शासन निदेशापासून ९० दिवसांत संदर्भित फेरबदलाबाबतची सूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध

करणे आवश्यक असल्यामुळे बैठकीच्या कार्यवृत्तास मंजूरी मिळण्याच्या अधिन राहून सूचना प्रसिद्धी करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : गोरेगांव येथील मेट्रो भवन या इमारतीच्या बांधकामासाठीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता तसेच या इमारतीच्या बांधकामासाठी निविदा मागविण्याबाबत**

९.१. सदर प्रकल्पाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी प्रकल्पांच्या ठळक वैशिष्ट्यांचे सादरीकरण केले. मेट्रो मार्ग बृहत् आराखडयानुसार शासनाने मान्यता दिलेल्या २७५.३ कि. मी. मेट्रो मार्गापैकी मेट्रो मार्ग-१ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा प्रकल्प गेल्या चार वर्षांपासून प्रवाशांसाठी कार्यान्वित करण्यात आलेला आहे. मेट्रो मार्ग २अ-दहिसर (पूर्व) - डी. एन. नगर आणि मेट्रो मार्ग ६ स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी हे दोन प्रकल्प मे. दिल्ली मेट्रो रेल महामंडळामार्फत Deposit Work म्हणून अंमलबजावणी करण्यात येत आहेत. मेट्रो मार्ग ३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ (लांबी ३३.५कि.मी.) असलेला पूर्णत: भूयारी मार्ग हा महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या समभागाने, जपान आंतरराष्ट्रीय सहकारी संस्था (JICA) यांच्या अर्थ सहाय्याने मुंबई मेट्रो रेल महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. मेट्रो मार्ग २ ब-डी.एन.नगर-मंडाळे, मेट्रो मार्ग ४-वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली व मेट्रो मार्ग-७ अंधेरी (पूर्व)-दहिसर (पूर्व) या मार्गांची अंमलबजावणी प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून त्यांची स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत. मेट्रो मार्ग-९ दहिसर-मिरा भाईंदर व मेट्रो मार्ग ७अ अंधेरी-छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मेट्रो मार्ग ५ ठाणे-भिवंडी-कल्याण या प्रकल्पांच्या स्थापत्य कामाकरीता निविदा प्रक्रीयेचे काम सुरु आहे. मेट्रो मार्ग ४अ कासारवडवली ते गायमुख या प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता मिळाली आहे. मुंबई महानगर प्रदेशात येणाऱ्या सर्व मेट्रो मार्गांच्या परिचालन व देखभालीसाठी राज्य शासनाने Mumbai Metro Operation Corporation Limited ची स्थापना करण्यास शासन पत्र क्र.MRD-3318/C.R.132/UD-७, अनुसार दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कंपनीचे नाव बदलण्यात आले असून, महा मुंबई मेट्रो ($M^3$) संचालन महामंडळ मर्यादित असे करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी

सादर करण्यात आला आहे. सदरच्या मेट्रो प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालात या सर्व मेट्रो मार्गांच्या परीचालनासाठी वेगवेगळया परीचालन केंद्र हे त्या मार्गांच्या निगडीत डेपोमध्ये प्रस्तावित केलेले आहे. परंतु, या सर्व मेट्रो मार्गांचे अंतर संचालनासाठी व परीचालनाच्या सुलभतेसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे संयुक्त परीचालन केंद्र (Integrated Operational Control Centre) असणे गरजेचे आहे. मेट्रो मार्गांच्या परिचालनासाठी तसेच देखभालीसाठी असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे मेट्रो प्रशिक्षण केंद्र व तांत्रिक व प्रशासकीय इमारत उभारण्याचे प्रस्तावित आहे. सदरच्या इमारतीसाठी गोरेगांव येथे CTS No.589/अ येथे मेट्रो भवन उभारणीसाठी राज्य शासनाकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

९.२. मेट्रो भवनबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाच्या १३ मेट्रो मार्गिकांच्या २७५.३ कि.मी. मेट्रो मार्गासाठी एका ठिकाणांहून परिचालन करण्यासाठी Operational Control Centre प्रस्तावित केलेले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची मेट्रो प्रशिक्षण संस्था, विविध Simulators व मेट्रो निगडीत तांत्रिक कार्यालये आरे, गोरेगाव येथील प्रस्तावित मेट्रो भवन या इमारतीत एका ठिकाणांहून कार्यरत राहणार आहेत. मुंबई मेट्रो मार्गांची व्याप्ती पाहता १३ मेट्रो मार्गिकांचे परिचालन आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान व अद्यावत उपकरणे वापरून एकाच OCC मधून होणे हे जागतिक स्तरावर सर्वोत्तमापैकी एक असणार आहे.

९.३. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रस्तावित मेट्रो भवन या इमारतीत तीन भाग आहेत :-

- तेरा मेट्रो मार्गिकांचे Operational Control Centre (क्षेत्रफळ सुमारे २४२९३ चौ.मी.)
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे मेट्रो प्रशिक्षण केंद्र (क्षेत्रफळ सुमारे ९६२४ चौ. मी.) तसेच
- तांत्रिक व प्रशासकीय कार्यालये (क्षेत्रफळ सुमारे ८०१७१ चौ. मी.)

प्रस्तावित मेट्रो भवन या इमारतीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे संयुक्त परिचालन केंद्र यामध्ये केंद्रीय सी.सी टी.व्ही.देखभाल केंद्र, मेट्रो माहिती संकलन केंद्र, OCC Theatre with viewing gallery व आंतरराष्ट्रीय दर्जाचे मेट्रो प्रशिक्षण केंद्र यामध्ये Rolling stock Simulator (प्रतिकृती) प्रेक्षागृह, ग्रंथालय व प्रशिक्षणार्थीसाठी निवास व्यवस्था, बहुउद्देशीय हॉल व ६००० तांत्रिक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची आसन क्षमता असणारे कार्यालये आहेत.

९.४. प्रस्तावित मेट्रो भवनसाठी दिलेल्या भूखंडाचे क्षेत्रफळ २०३८७ चौ.मी. असून, त्यावर सुमारे ११२२२० चौ.मी. बांधकाम क्षेत्र (Built- Up Area) प्रस्तावित आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ३२

मजली उंच इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकात खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे :-

| Sr. No. | Description | Amount (in INR) |
|---|---|---|
| 1 | Civil works | 5,02,50,07,577.00 |
| 2 | Electrical works | 2,10,96,00,901.00 |
| 3 | PHE WORKS | |
| | (i) Low Side | 11,72,10,348.00 |
| | (ii) STP and WTP | 2,00,70,700.00 |
| 4 | Fire fighting works | 9,63,91,035.00 |
| 5 | HVAC & BMS | 43,33,85,997.00 |
| 6 | Landscape and Horticulture | 7,18,93,728.59 |
| 7 | Furniture Works | 53,54,93,870.00 |
| 8 | OCC Interior Works | 52,22,93,871.50 |
| 9 | Signage, Art Works & Sculpture | 17,49,36,760.00 |
| 10 | Lifts | 25,25,32,232.00 |
| 11 | Miscellaneous Items and R&R | 56,94,19,394.00 |
| | **TOTAL (A)** | **992,82,36,414.00** |
| 12 | ADD Contingencies @ 3 % and 1% Labour Cess of Total (A) | 39,71,29,456.56 |
| | **GRAND TOTAL** | **1032,53,65,870.65** |

९.५. विविध मेट्रो मार्गांच्या सविस्तर प्रकल्प अहवालात मेट्रो भवन व OCC या शिर्षाअंतर्गत एकूण रक्कम रु.५५० कोटी एवढ्या रक्कमेस राज्य शासनाची मान्यता मिळालेली आहे. गोरेगाव येथील मेट्रो भवन या प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता, मेट्रो भवन इमारतीच्या बांधकामासाठी अंदाजित रक्कम रु.१०३२.५४ कोटी एवढ्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या बांधकामाच्या निविदा मागविण्यासाठी महानगर आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला.

९.६. सविस्तर चर्चेनंतर, बाब टिपणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजुर केला:-

**ठराव क्र.१४९७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उप कलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन तसेच गोरेगाव येथील मेट्रो भवन या प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता प्राधिकरण याद्वारे मेट्रो भवन इमारतीच्या बांधकामासाठी अंदाजित रक्कम रु.१०३२.५४ कोटी एवढ्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी प्राधिकरणाच्या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची वाट न बघता प्रकल्पाच्या कामाच्या निविदा मागविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

**“आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.१० : स्व.बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम करणे – (इंटरप्रिटेशन सेंटर व अभ्यांगत कक्षाचे बांधकाम करणे, महापौर निवासस्थान इमारतीचा सांस्कृतिक ठेवा जतन करुन या इमारतीचे संग्रहालयामध्ये रुपांतरीत करणे व सभोवतालच्या परिसराचे सुशोभिकरण करणे (इत्यादी) – कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत**

१०.१. सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग यांचा दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबईतील महापौर निवासस्थानाच्या जागेवर स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करण्यास मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या रु.१०० कोटी रक्कमेचा खर्च सुरुवातीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांच्या निधीमधून करावा असे प्राधिकरणास निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर स्मारकाच्या बांधकामावर प्राधिकरणामार्फत होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी आवश्यक निधीची मागणी सामान्य प्रशासन विभागाकडे करण्यात यावी असेही निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिनांक ०७ जानेवारी, २०१९ रोजी सादर केलेल्या टिप्पणीस मान्यता दिली आहे हे विचारात घेऊन प्राधिकरणाच्या सुधारित अर्थसंकल्पामध्ये (Annual Budget २०१८-२०१९) रु.५ कोटी खर्चाची तरतुद करण्यास तत्वत: मंजूरी देण्यात आली होती, त्यानुसार प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ सुधारित अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्यात आली आहे.

१०.२. महानगर आयुक्त यांनी प्रकल्पाविषयी माहिती देताना, असे सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये महापौर निवासस्थानाचे सुशोभिकरण करणे, इंटरप्रिटेशन इमारत बांधणे, अभ्यांगत कक्ष इमारत बांधणे तसेच बागबगीचा व परिसराचा विकास करणे इत्यादी कामांचा समावेश असून प्रकल्पाच्या

एकूण खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम करणे - इंटरप्रिटेशन सेंटर व अभ्यागत कक्षाचे बांधकाम करणे, महापौर निवासस्थान इमारतीचा सांस्कृतिक ठेवा जतन करुन या इमारतीचे संग्रहालयामध्ये रुपांतरीत करणे व सभोवतालच्या परिसराचे सुशोभिकरण करणे इत्यादी (स्थापत्य, विद्युत कामे वस्तु व सेवाकरासहित). | ८७,४६,१४,६१३.०० |
| २ | सल्लागाराची फी (३%) | २,६२,३८,४३८.०० |
| ३ | सल्लागाराच्या फी करीता वस्तु व सेवा कर (१८%) | ४७,२२,९१९.०० |
| ४ | गुणनियंत्रण चाचणी, रॉयल्टी, शासनाचे इतर शुल्क व इतर संकिर्ण बाबी इ. खर्च | १,१८,५५,२३०.०० |
| ५ | एकूण किंमत | ९१,७४,३१,२००.०० |
| ६ | आकस्मिक खर्च (४%) | ३,६६,९७,२४८.०० |
| ७ | कार्यव्यही आस्थापना (५%) | ४,५८,७१,५६०.०० |
| ८ | **प्रकल्पाची एकूण किंमत** | **१००,००,००,०००.००** |

१०.३. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्रकल्पाची निविदा सूचना दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित झाली असून ई-निविदा दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी प्राधिकरणाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली आहे.

१०.४. सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१४९८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोट कलम (२) व कलम १२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून स्व.बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम करण्यास अंदाजित रक्कम रु.१०० कोटीच्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिनांक ०७ जानेवारी, २०१९ रोजी सादर केलेल्या टिप्पणीस मान्यता दिली आहे हे विचारात घेऊन प्राधिकरणाच्या सुधारित अर्थसंकल्पामध्ये (Annual Budget २०१८-२०१९) रु.५ कोटी खर्चाची तरतुद करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी प्राधिकरणाच्या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता प्रकल्पाच्या कामाच्या निविदा मागविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अमंलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डोंबिवली व भिवंडी शहराला जोडणाऱ्या माणकोली व मोटागाव रस्त्याच्या कामाच्या सुधारीत खर्चाच्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत**

११.१. महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, विषयांकित कामाचा रु.४५०.६० कोटी सुधारीत खर्चाच्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु सदर खर्चामध्ये कपात करण्याच्यादृष्टीने महानगर आयुक्त यांनी सुधारित नवीन प्रस्ताव बैठकीत सादर केला. सुधारीत प्रस्ताव व त्याचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | वर्णन | लांबी (कि.मी.) | रुंदी (मी.) | किंमत (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|
| **महानगर आयुक्तांनी सुचविल्याप्रमाणे सद्य:स्थितीत खर्च कमी करण्याच्या दृष्टीने केलेला तपशिल (३० मी.रुंदीमध्ये रस्त्याचे काम करणे.)** | | | | |
| १ | माणकोली ते उल्हास खाडीवरील पुलापर्यंत रस्ता | ३.३० | ३०.०० | ४१.०० |
| २ | मुंबई नाशिक महामार्गावरील माणकोली येथे इंटरचेंज (Junction) ची कामे | (दोन्ही बाजूकडील उजवे वळण वगळून) | | २०.०० |
| ३ | १ भूयारी मार्गाचे काम | ०.४ | १०.०० | १५.०० |
| | **प्रकल्पाच्या बांधणीचा बांधकामाचा अंदाजित खर्च** | | | **७६.००** |
| | सल्लागार शुल्क (@ २%) (अंदाजित) | | | १.३८ |
| | आकस्मिक खर्च (@५%) | | | ३.४५ |
| | सेवा वाहिन्या हलविणे (@ १०%) | | | ६.९० |
| | **अ) प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च** | | | **८७.७३** |
| | **ब) भूसंपादनाचा खर्च (३० मी. रुंद)** | | | **७३.२५** |
| | **प्रशासकीय मान्यतेची एकूण रक्कम (अ+ब)** | | | **१६०.९८** |

११.२. महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, पूर्वीच्या रु.४५०.६० कोटीच्या अंदाजित खर्चामध्ये खालीलप्रमाणे कामाची व्याप्ती कमी केली :-

१. तीन भूयारी मार्गा ऐवजी फक्त एका भूयारी मार्गाचे काम करणे.
२. ४५ मी. ऐवजी ३० मी. रुंदीमध्ये रस्त्याचे काम करणे.
३. सेवा रस्ता (७.५ मी. रुंद, मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूस) चे काम वगळणे.
४. माणकोली जंक्शन जवळ उजव्या वळणासाठी केलेली इंटरचेंजची तरतूद वगळणे.
५. रस्त्याचे भूसंपादन ४५ मी. ऐवजी ३०मी. रुंदीपर्यंत करणे.

वरील प्रमाणे कामाची व्याप्ती कमी झाल्याने सद्य:स्थितीत रु.१६०.९८ कोटी इतक्या अंदाजित रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरिता प्राधिकरणाच्या समितीची आवश्यकता आहे.

११.३. सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१४९९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, विस्तारीत नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत डोंबिवली व भिवंडी शहरांना जोडणाऱ्या प्रस्तावित माणकोली-मोटागांव रस्त्याच्या कामाची सुधारीत प्रशासकीय किंमत रु.१६०.९८ कोटी (भूसंपादनासहीत) रक्कमेस मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या मुंबईकडील बाजूस वाहतूक निर्गमन व्यवस्थेकरीता (Traffic Dispersal System) शिवडी ते वरळी या उन्नत मार्गाच्या बांधकाम खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

१२.१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या कंत्राटदारांना दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी कार्यारंभ आदेश (Commencement Letter) देण्यात आले. मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अहवालानुसार मुंबई पारबंदर

प्रकल्पाची व्यवहार्यता ही प्रकल्पाच्या दोन्ही बाजुकडील प्रभावी वाहतूक निर्गमन व्यवस्थेवर (Traffic Dispersal System) अवलंबून आहे. या अनुषंगाने प्राधिकरणाने मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या मुंबई बाजुकडील प्रभावी वाहतूक निर्गमन व्यवस्थेकरिता शिवडी ते वरळी हा उन्नत मार्ग राबविण्याचे प्रस्तावित केले आहे.

१२.२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या उन्नत मार्गाची लांबी सुमारे, ४.५ कि.मी. असून रुंदी सर्वसाधारणपणे १७.२० मी. प्रस्तावित आहे. प्रस्तावित उन्नत मार्ग शिवडी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडून सुरू होऊन हार्बर रेल्वेमार्ग ओलांडून, आचार्य दोंदे मार्ग, डॉ. आंबेडकर मार्ग ओलांडून, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ मध्य व पश्चिम रेल्वे मार्ग ओलांडून, सेनापती बापट मार्ग ओलांडून, जगन्नाथ भातणकर मार्गावरून, कामगार नगर-१ व कामगार नगर-२ येथून डॉ. ॲनी बेझंट मार्ग ओलांडून, नारायण हर्डीकर मार्ग वरळी येथे संपतो. सदर उन्नत मार्ग आचार्य दोंदे मार्गावर जी. डी. आंबेकर मार्ग ते डॉ. ई.बोर्जेस मार्ग यांचे दरम्यानच्या लांबीमध्ये मोनोरेलवरून नेणे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे सदर उन्नतमार्ग डॉ.आंबेडकर मार्गावरील उड्डाणपूल व सेनापती बापट मार्गावरील उड्डाणपुलावरून जातो. शिवडी-वरळी उन्नतमार्ग प्रकल्पाच्या सुमारे रु.५१७ कोटी इतक्या अंदाजित किंमतीस दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी झालेल्या १३२व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

१२.३. महानगर आयुक्त यांनी आणखी असे सांगितले की, शिवडी-वरळी उन्नत मार्गाचा प्रकल्प अहवाल अद्ययावत करणे, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या मुंबई बाजुकडील वाहतूक निर्गमनात सुधारणा करणे, शिवडी-वरळी उन्नत मार्गाऐवजी पर्याय म्हणून भुयारी मार्ग करण्याची शक्यता पडताळून पहाणे आणि प्रकल्पासाठी कंत्राटदाराच्या नियुक्तीकरीता निविदा प्रक्रियेत प्राधिकरणास आवश्यक सहाय्य करणे इत्यादी बाबींकरिता प्राधिकरणाने मे.मोनार्च सर्व्हेअर्स अँन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. यांची नियुक्ती केली आहे. मे. मोनार्च सर्व्हेअर्स अँन्ड इंजिनिअर्स प्रा. लि. यांनी शिवडी-वरळी उन्नत मार्गाऐवजी पर्याय म्हणून भुयारी मार्ग तयार करण्याच्या दृष्टीने व्यवहार्यता अभ्यास (Feasibility Study) केला. त्यानुसार प्रस्तावित भुयारी मार्गाच्या आखणीमधील मोनोरेल प्रकल्पाच्या पायामुळे (Foundation) येणारा अडथळा, सदर भुयारी मार्ग मुंबई पारबंदर प्रकल्पास जोडण्यासाठी आवश्यक असलेला उतार (Gradient) मिळत नसल्यामुळे, तसेच वरळीकडील बाजूस व आचार्य दोंदे मार्गावर भुयारी मार्गासाठी आवश्यक ती जागा उपलब्ध नसल्यामुळे भुयारी मार्ग बांधणे शक्य होणार नाही असे सल्लागाराने

सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे शिवडी-वरळी मार्ग हा फक्त उन्नत मार्ग बांधण्याचा एकच पर्याय उपलब्ध असल्याचे सल्लागाराने नमूद केले आहे.

१२.४. महानगर आयुक्त यांनी आणखी असेही सांगितले की, उपरोक्त रस्त्याच्या आखणीमध्ये प्रभादेवी (एलफिन्स्टन रोड) स्थानक व शिवडी रेल्वे स्थानक येथे रेल्वे ओलांडणी पूल (Rail Over Bridge-ROB) बांधणे प्रस्तावित आहे. यापैकी प्रभादेवी (एलफिन्स्टन रोड) स्थानक येथील अस्तित्वातील सुमारे १२० वर्षे जुना एलफिन्स्टन रोड रेल्वे उड्डाणपूल पाडून त्या जागी नव्या रेल्वे ओलांडणी पूलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. शिवडी रेल्वे स्थानक व प्रभादेवी (एलफिन्स्टन रोड) स्थानक येथील रेल्वे ओलांडणी पुलांच्या बांधकामामधील गुंतागुंत (Complexity) विचारात घेऊन सदर प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण करण्याकरिता सदर रेल्वे ओलांडणी पुलांचे नियोजन व बांधकाम महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याकडे हस्तांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. सल्लागाराने शिवडी-वरळी उन्नत मार्गाकरीता अद्ययावत सविस्तर प्रकल्प अहवाल व सुधारित अंदाजपत्रक सादर केले. तसेच प्रकल्पाच्या बांधकाम किंमतीमध्ये झालेली वाढ मुख्यत्वे करून अतिरिक्त पोचमार्ग, प्रभादेवी (एलफिन्स्टन रोड) रेल्वे ओलांडणी पुलाच्या ठिकाणी द्विस्तरीय रेल्वे ओलांडणी पुलाचे बांधकाम, अनिवार्य गाळयांच्या (Obligatory Span) ठिकाणी प्रस्तावित स्टील सुपर स्ट्रक्चरचे गाळे, उड्डाणपुलाचे अंदाजपत्रकाकरीता सन २०१८-२०१९ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीचा वापर, अंदाजपत्रकामध्ये वस्तु व सेवा कराचा (GST) तसेच बांधकाम कालावधीतील भाववाढ आणि उड्डाणपुलाच्या आखणीमध्ये जमिनीखालील पाईपलाईन्स, सेवावाहिन्या, केबल्स इत्यादींचे पुनर्विस्थापनाकरीता पुलाच्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली तरतूद इत्यादींमुळे असल्याचे त्यांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले. वरील बाबींमुळे पूर्वीच्या प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीमध्ये वाढ होत असून सल्लागाराने सादर केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे प्रकल्पाच्या बांधकामाची सुधारीत अंदाजित किंमत रु.१,२७६ कोटी इतकी असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

१२.५. सदर प्रकल्प हा वांद्रे वरळी सागरी सेतू व कोस्टल रोड यांना मुंबई पारबंदर प्रकल्पाशी जोडणारा अत्यंत महत्वाचा दुवा असल्यामुळे शिवडी वरळी उन्नत मार्गाचे काम हे मुंबई पारबंदर प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी पूर्ण करावयाचे प्राधिकरणाचे नियोजन आहे. हा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या

आव्हानात्मक असून मुंबई शहराकरीता अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे महानगर आयुक्तांनी निदर्शनास आणले. प्राधिकरणाच्या सदस्यांनी याबाबत सहमती दर्शविली. मुंबई पारबंदर प्रकल्पाकरीता अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या शिवडी वरळी उन्नत मार्गाच्या प्रकल्पाच्या निविदा सूचना लवकरात लवकर काढण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिले.

१२.६. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५०० :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क) (ड) (ई) व (ग), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे शिवडी व वरळी उन्नत मार्गाचे बांधकामाकरिता रु.१,२७६ कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाची निविदा काढण्याकरीता, प्रकल्पाची अंमलबजावणी करणेकरीता कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता त्यापुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१३</u> : <u>परदेशातील शासकीय व निमशासकीय संस्थासोबत कामकाज व सेवा पुरविण्याच्या धोरणासाठी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) कार्यान्वित करण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता मिळण्याबाबत</u>**

१३.१. परदेशातील शासकीय व निमशासकीय संस्थांसोबत कामकाज व सेवा पुरविण्याच्या धोरणासाठी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावावर महानगर आयुक्त यांनी सविस्तर सादरीकरण केले.

१३.२. महानगर आयुक्त यांनी सादरीकरण करताना असे सांगितले की, परदेशातील शासकीय व निमशासकीय संस्थांसोबत तेथे राबविण्यात येत असलेल्या नवनविन योजनांची माहिती घेऊन कामकाज व सेवा पुरविण्याच्या धोरणासाठी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) कार्यान्वित करण्याची आवश्यकता आहे. तसेच, प्राधिकरणास सदर संस्थांबरोबर सद्य:स्थितीस

सर्वसाधारण हेतू साध्य करण्यासाठी परदेशातील शासकीय व निमशासकीय संस्थांबरोबर झालेल्या सामंजस्य कराराचे (MoU) अंमलबजावणी करण्यासाठी महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांना अधिकार नाहीत.

१३.३. मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सुचविले की, सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी Department of Economic Affairs (DEA) यांची परवानगी घ्यावी लागते किंवा कसे याबाबत विचारणा केली.

१३.४. महानगर आयुक्त यांनी महानगर क्षेत्रातील शहरी वाहतूक आणि परिवहन संबंधित सेवांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी शासकीय/निमशासकीय विदेशी संस्थांना DMRC, RITES, IIT आणि VJTI संस्था प्रमाणेच एकस्त्रोत आधारावर नियुक्ती करण्याबाबत अवगत केले. यावर मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी प्राधिकरणाअंतर्गत शाखा सल्लागार केंद्राची (Consultancy Wing) स्थापन करण्याचे निर्देश दिले. यावर महानगर आयुक्त यांनी प्राधिकरण व्यावसायिक विकास शाखा (Business Development Cell) ची स्थापना करण्याचा विचाराधीन आहे अशी माहिती दिली.

१३.५. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५०१ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे परदेशातील शासकीय व निमशासकीय संस्थांसोबत कामकाज व सेवा पुरविण्याच्या धोरणासाठी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) कार्यान्वित करण्यासाठी खालील बाबींना मान्यता देत आहे :-

१. सर्वसाधारण हेतू साध्य करण्यासाठी महानगर आयुक्तांनी शिफारस केलेल्या परदेशी शासकीय व निमशासकीय संस्थांबरोबर जसे की, मिलान मेट्रो, मिलान महापालिका, सिंगापूर लँड ट्रान्सस्पोर्ट ऑथोरिटी, सिंगापूर मास रॅपिड ट्रान्झिट (SMRT), मास ट्रान्झिट रेल्वे हाँगकाँग (MTR Hong Kong), Transport for London (TfL) या संस्थांबरोबर सामंजस्य करार (MoU) कार्यान्वित करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

२. त्या संस्थांबरोबर सर्वसाधारण हेतू साध्य करण्यासाठी परदेशातील शासकीय व निमशासकीय संस्थांबरोबर झालेल्या सामंजस्य कराराचे (MoU) अंमलबजावणी करण्यासाठी महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. महानगर आयुक्तांना अशा सामंजस्य करारात ज्यात महाराष्ट्र शासन, परदेशी शासकीय व निमशासकीय संस्थांबरोबर अस्तित्वात असलेल्या करारात द्विपक्षीय/त्रिपक्षीय करार प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा ह्यांना शहरी वाहतूक आणि परिवहन संबंधित सेवांसाठी शासकीय/निमशासकीय विदेशी संस्थांना, DMRC, RITES, IIT आणि VJTI इत्यादी सारख्या शासकीय संस्थांना समान पध्दतीने एकस्त्रोत आधारावर नियुक्त करण्यास महानगर आयुक्त ह्यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (DMRC) सारख्या वाजवी खर्चावर व एकस्त्रोत आधारावर आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा शासकीय संस्थांसाठी तांत्रिक समर्थन घेण्याकरिता, महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र.१४ : वांद्रे-कुर्ला संकुलात एकेरी वाहतूक (One Way Traffic System) पद्धतीची अंमलबजावणी आणि संकुलातील रस्त्यांचे नामकरण करण्याबाबत**

१४.१. महानगर आयुक्त यांनी वांद्रे-कुर्ला संकुलात एकेरी वाहतूक (One-Way Traffic System) पध्दतीची अंमलबजावणी आणि संकुलातील रस्त्यांचे नामकरण करण्यासंबंधी सविस्तर सादरीकरण केले. महानगर आयुक्त यांनी सदर एकेरी वाहतूक पद्धतीची अंमलबजावणी आणि संकुलातील रस्त्यांचे नामकरण करण्याबाबत बीकेसी प्लॉट ओनर्स असोसिएशन आणि ट्रॅफिक पोलिस यांना सविस्तर सादरीकरण केले असून त्यांनी यास संमती दर्शविली आहे अशी माहिती दिली.

१४.२. **एकेरी वाहतुक पध्दती (One Way Traffic System) :**

महानगर आयुक्त यांनी वांद्रे-कुर्ला संकुलात होणाऱ्या वारंवार वाहतूक कोंडीच्या समस्येसाठी उपाययोजना म्हणून त्वरीत अंमलबजावणी करणे शक्य असलेल्या एकेरी वाहतूक पध्दतीची अंमलबजावणी तसेच या योजनेतंर्गत फक्त वांद्रे-कुर्ला जोडरस्ता (४५ मी.) आणि ३० मी. रस्त्यांवर दुहेरी वाहतूकीची सुविधा उपलब्ध करणे तसेच उर्वरित रस्त्यांवर एकेरी वाहतूक पध्दतीचा अवलंब करण्याबाबत सविस्तर सादरीकरण केले. सदर एकेरी वाहतूक पद्धतीचा अवलंब केल्यानंतर बीकेसी कनेक्टर वरुन येणाऱ्या वाहतुकीस बीकेसी परीसरातून थेट पश्चिम उपनगराकडे जाण्यापासून रोखण्यासाठी करण्यात आला आहे, अशी माहिती दिली.

सदर प्रस्तावावर माहिती देताना, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की सुरुवातीस ट्रॅफिक वार्डन्स यांच्या सहाय्याने अंमलबजावणी करण्यात येईल. तद्नंतर योग्य तांत्रिक, CCTV सर्व्हिलन्स पद्धतीने वाहतुकीची निगराणी करण्यात येईल.

सविस्तर चर्चेदरम्यान, मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले की, सदर योजना ही सुरुवातीस एक किंवा दोन महिन्यांकरीता प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी. सदर याजनेचे परिणाम पाहता या योजनेची दिर्घकाळासाठी अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच एकेरी वाहतूक बद्दलचा प्रस्ताव हा बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सादर करावा.

१४.३. **वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यांचे नामकरण :**

महानगर आयुक्त यांना वांद्रे-कुर्ला संकुलात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा संस्था येणार असून वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यांचे नामकरण करण्याची नितांत गरज असल्याबाबतचे सविस्तर विवेचन केले.

यावर मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले की, सुरुवातीस वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यांना प्रस्तावित नावे देण्यात यावीत आणि भविष्यात येणाऱ्या नामकरण बाबतचे प्रस्ताव पाहता नंतर आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

१४.४. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५०२ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, वांद्रे-कुर्ला संकुलात एकेरी वाहतूक (One-Way Traffic System) पध्दतीची अंमलबजावणी आणि संकुलातील रस्त्यांचे नामकरण करण्याकरीता खालील बाबींना मान्यता देत आहे :-

१. वांद्रे-कुर्ला संकुलात "जी ब्लॉक आणि जी Text ब्लॉक" मध्ये एकेरी वाहतूक पध्दतीची (One-Way Traffic System) अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या बाबत अधिसूचना निर्गमित करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम क्र.३२७ नुसार निर्देश देण्यासाठी शासनास शिफारस करण्यात येत आहे.

२. कार्यरत असलेल्या वांद्रे-कुर्ला जोडरस्त्याला 'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स ॲव्हेन्यु' वा 'बीकेसी ॲव्हेन्यु' असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचबरोबर, वांद्रे-कुर्ला

जोडरस्त्याला दक्षिण दिशेस समांतर असणाऱ्या रस्त्यांना विषम प्रमाणात म्हणजे ॲव्हेन्यु १, ॲव्हेन्यु ३, ॲव्हेन्यु ५ इ. तसेच उत्तर दिशेस समांतर असणाऱ्या रस्त्यांना समप्रमाणात म्हणजे ॲव्हेन्यु २, ॲव्हेन्यु ४, ॲव्हेन्यु ६ असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. वांद्रे-कुर्ला जोडरस्त्याला छेदणाऱ्या अथवा जोडणाऱ्या रस्त्यांना स्ट्रीट म्हणून नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचबरोबर, वांद्रे-कुर्ला जोडरस्त्याला दक्षिण बाजूने जोडणाऱ्या छेद रस्त्यांना विषम प्रमाणात जसे की, स्ट्रीट १, स्ट्रीट ३, स्ट्रीट ५ इ. व उत्तर दिशेस जोडणाऱ्या रस्त्यांना समप्रमाणात म्हणजेच स्ट्रीट २, स्ट्रीट ४, स्ट्रीट ६ इ. असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. वांद्रे-कुर्ला संकुल अंतर्गत रस्त्यांना (Street) समांतर अथवा छेदणाऱ्या रस्त्यांना लेन म्हणून नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. जसे की, लेन १, लेन २, लेन ३ इ.

५. वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये एकेरी वाहतूक पध्दतीची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेल्या रस्त्यांच्या संरचनेमध्ये (Cross-Section) आवश्यक ते बदल करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच, सदर बदल करण्यास रु. ५०.०० कोटी इतक्या अंदाजित करण्यात आलेल्या किंमतीस तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

६. एकेरी वाहतूक पद्धतीच्या सुरुवातीस १ ते २ महिन्याच्या कालावधीसाठी प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करताना तसेच वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यांचे नामकरण करताना काही किरकोळ सुधारणा भासल्यास सदर सुधारणा करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१५</u> : <u>वडाळा मोनोरेल आगार परिसराचा परिवहन केंद्रीत विकासाकरीता (Transit Oriented Development) प्राधिकरणाची मान्यता मिळण्याबाबत</u>**

१५.१. महानगर आयुक्त यांनी उपरोक्त बाबीच्या अनुषंगाने चेंबूर-वडाळा-संत गाडगे महाराज चौक या मोनोरेल मार्गाचे, डेपोची जागा, उपलब्ध जमीन, प्रस्तावित मेट्रो मार्ग-४ ची मार्गिका वडाळा मोनोरेल आगार परिसराचा परिवहन केंद्रीत विकासाचे (Transit Oriented Development) पर्याय इ. बाबतचे सविस्तर सादरीकरण केले.

१५.२. महानगर आयुक्त यांनी अशीही माहिती दिली की, मेट्रो मार्ग-४ आणि मोनोरेल मार्गिका वडाळा डेपो परिसरात असल्याने परिवहन केंद्रित विकासाची संकल्पना प्रायोगिक तत्त्वावर

राबविण्यासाठी वडाळा डेपो हे योग्य ठिकाण आहे. सादरीकरण दरम्यान परिवहन केंद्रीत विकासाचे विविध पर्याय दाखविण्यात आले आणि असे नमूद केले की, प्रस्तावित पर्यायामधून चटई क्षेत्र निर्देशांक-४ नुसार सुमारे २.५२ लाख चौ.मी. बिल्ट अप एरिया उपलब्ध होणार असून (Transit Oriented Development) यातून सुमारे रु. १३०० कोटी ते रु.१७०० कोटी इतका निधी प्राधिकरणास प्राप्त होणे अपेक्षित आहे. महानगर आयुक्त यांनी सादरीकरण दरम्यान अशी माहिती दिली की, सद्य:स्थितीत सदर जमीन ही केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग (Central Public Works Department) यांच्या मालकीची असून प्राधिकरण सदर जमिनीच्या मालकीसाठी विभागीय आयुक्त यांच्याकडे अपिल करणार आहे. तसेच CPWD च्या नावाने असलेली सदर जागा प्राधिकरणाच्या नावाने Mutation entry करण्याचे प्रस्तावित आहे.

१५.३. सदर प्रस्तावावर चर्चा करताना, मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सुचविले की, मोनोरेल आगार जवळच असलेल्या आणिक नगर डेपो, प्रतिक्षा नगर बस डेपो यांचा देखील प्रस्तावित विकास योजनेत विचार करण्यात यावा. यावर महानगर आयुक्त यांनी असे आश्वासित केले की, सदर प्रस्ताव हा महाव्यवस्थापक, बेस्ट तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सोबत चर्चा करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१५.४. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५०३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, वडाळा मोनोरेल आगार परिसराच्या परिवहन केंद्रित विकासाचे या प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता, या प्रकल्पाच्या खालील बाबींना मान्यता देत आहे :-

१. वडाळा मोनोरेल डेपो जमिनीचे प्राधिकरणाद्वारे परिवहन केंद्रित विकास (TOD) करण्याकरीता Central Public Works Department (CPWD) च्या नावाने केलेली जमीन लवकरात लवकर प्राधिकरणाच्या नावाने Mutation entry करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

२. मोनोरेल वडाळा डेपो येथील जमिनीचे परिवहन केंद्रित विकास (TOD) करण्यास प्राधिकरणास मिळण्याबाबत मान्यता देत आहे.

३. मोनोरेल वडाळा डेपोच्या परिवहन केंद्रित विकासासाठी (TOD) निविदा प्रक्रिया करुन विकासकाची नियुक्ती करण्यास प्राधिकरणामार्फत मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१६ : मुंबई मेट्रो मार्ग-१ — वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर — कर्जदात्यांसाठी मुंबई मेट्रो वन प्रा.लि.द्वारा प्रस्तावित कर्ज निवारण योजनेच्या मंजूरीबाबत**

१६.१. प्रस्तावावर माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्रकल्प सुरू झाल्यापासून मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) ला अनेक बाह्य घटकांमुळे आणि त्यांच्या नियंत्रणाबाहेरच्या कारणांमुळे तोटा होत असल्याने मुंबई मेट्रो वन प्रा. लि. आर्थिक तणावाखाली आहे. मुंबई मेट्रो वन प्रा.लि.द्वारा दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी लेखापरिक्षण न केलेल्या वित्तीय तक्त्यानुसार (Unaudited Financial Statement) कंपनीचे संचित नुकसान रू.१३९०.९१ कोटी (दिनांक ३१ मार्च, २०१८ नुसार रू.१२०९.५० कोटी) दर्शविले असून एकूण कर्ज रु.१९२८ कोटी इतके आहे. सदरहू कर्जाचे दायित्व सांभाळण्यास सक्षम नसल्याकारणाने मुंबई मेट्रो वन प्रा.लि. ने कर्ज निवारण योजना (Debt Resolation Plan) प्रस्तावित केलेल्या प्रकल्पाचा उद्देश आणि प्राधिकरणाची प्रकल्पात असणारी भागीदारी लक्षात घेता, प्राधिकरणाने मुंबई मेट्रो वन प्रा.लि. द्वारा प्रस्तावित कर्ज निवारण योजनेला, ठरावात नमूद असलेल्या अटींना अधीन ठेवून मान्यता देण्यात आली.

१६.२. महानगर आयुक्त यांनी सदर मेट्रो मार्ग-१ बाबत कर्जदात्यांसाठी मेट्रो वन प्रा.लि. ने प्रस्तावित केलेल्या कर्ज निवारण योजनेचे सादरीकरण केले. महानगर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, सदर योजनेला मंजूरी देताना मुं.म.प्र.वि.प्राधिकरण किंवा महाराष्ट्र सरकारकडून कुठलाही अतिरिक्त निधी दिला जाणार नाही. तसेच कुठलीही हमी दिली जाणार नाही. तसेच, मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ने कर्ज निराकरण योजना मंजूर करतांना कोणत्याही संस्थेस अथवा व्यक्तीस कर्ज रोखे, प्राधान्य समभाग अदा केल्यास प्राधिकरणाच्या समभाग रचनेत समभाग २६% च राहील व याकरीता प्राधिकरण कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त अंशदान देणार नाही. तसेच प्राधिकरणाच्या मतदानाचा अधिकारात कोणताही बदल होणार नाही. तसेच प्राधिकरणाचे सवलत करार (Concession Agreement), भागधारक

करार (Share Holding Agreement), संघटनेचा करार (Articals of Association) आणि सर्व संबंधित कागदपत्रांनुसार असलेले सकारात्मक अधिकार (Affirmative Rights) आणि इतर सर्व अधिकार अप्रभावित राहतील आणि कोणत्याही प्रकारे कमी केले जाणार नाहीत. तसेच, या निराकरण योजनेसाठी कोणताही खर्च, परिणाम, कर्तव्यात चूक आणि इतर कोणत्याही उत्तरदायित्वासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण आणि राज्य शासन जबाबदार राहणार नाही. तसेच याकरिता त्रि-पक्ष/ प्रवर्तक/मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ला कोणत्याही प्रकारे बँक कर्ज, बाहय व्यावसायिक कर्ज (ECB), ICDs, क्रेडिटर्स (Capex or Others) किंवा इतर दुय्यम कर्ज (Subordinated Debt), प्राधान्य भागधारक (Preference Share Holders), इतर समभाग (Other Equity) किंवा इतर कोणत्याही प्रकारचे दायित्व यासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

१६.३. महानगर आयुक्तांनी अशीही माहिती दिली की, मुंबई मेट्रो वन प्रा.लि. च्या संचालक मंडळाच्या ठरावात आणि पत्रामध्ये कंपनीद्वारे घेतलेल्या कर्जाची परतफेडीच्या विवरण पत्राचा समावेश नाही. तसेच, रुपये मुदत कर्ज (RTL) आणि बाह्य व्यावसायिक कर्ज (ECB) यांची सन २०३८ पर्यंत संपूर्ण कर्जांच्या रक्कमेची परतफेड निश्चित केलेली आहे, परंतु रक्कम परतीच्या वेळेची अनुसूची (Schedule of Payment) दिलेली नाही, ती मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ च्या पत्राद्वारे सादर केलेली आहे. तसेच, कर्जाच्या निराकरण योजनेला (Debt Resolution Plan) मंजुरी देण्याकरिता परतफेड अनुसूची (Repayment Schedule) ठरावाचा भाग होणे आवश्यक आहे. तसेच, प्रस्तावामध्ये रुपये मुदत कर्ज (RTL) आणि बाह्य व्यावसायिक कर्ज (ECB) व्याजाची जेव्हा देय होईल तेव्हा त्याची परतफेड करण्यात येईल असे नमूद केले आहे. महानगर आयुक्तांनी पुढे अशी माहिती दिली की, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये दिलेल्या माहितीनुसार कंपनीसाठी कर्ज सेवा दायित्व (Debt Service obligation) मार्च, २०१८ पासून प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत मासिक व्याज न भरण्यासंदर्भातील अटी महत्वाच्या ठरतात. याकरिता Corporate Guarantee आणि CRPS वर Redemption Premium न भरल्यास त्याचा मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या Share Holding वर प्रतिकूलरित्या प्रभाव पडणार नाही किंवा मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो वन प्रा.लि. वर असणाऱ्या अधिकारावर प्रभाव होणार नाही. तसेच मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ला आणखी कोणत्याही निधीची भरपाई, देय खर्च देण्यासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

१६.४. महानगर आयुक्तांनी पुढे अशीही माहिती दिली की, प्रस्तावित Compulsory Redeemed Preference Shares (CRPS) वर देय लाभांश व्याज दराचा उल्लेख नाही. तसेच, यापूर्वी प्रस्तावित केल्यानुसार, २ वर्षांच्या कालावधीसाठी लाभांश (Dividend) परतफेड करणे गरजेचे असून, तसे न केल्यास प्राधान्य भागधारकांना (Preference Share Holders) सहभाग अधिकार आणि कंपनीच्या सर्वसाधारण बैठकीच्या ठरावांवर मत देण्याचे अधिकार प्राप्त होऊ शकतात. तसेच, मुंबई वन प्रा. लि. द्वारे Redemption Premium चे न भरलेल्या रक्कमेमुळे CRPS धारकांना समभाग धारक होण्यासाठी किंवा मुंबई मेट्रो वन प्रा. लि. मधील मतदानाचे अधिकार मिळणार नाहीत. तसेच, ही बाब मुंबई मेट्रो वन प्रा. लि. मंडळाद्वारे पुर्नरचना प्रस्तावास (Restructuring Proposal) मंजूरी देण्यासाठी आणि प्राधिकरणाच्या समाधानासाठी आवश्यक आहे. तसेच, कर्ज निराकरण योजना आणि त्याबाबतचा करार करताना प्रवर्तकाने अतिरिक्त निधी भरल्यास किंवा भाग भांडवलाचे हस्तांतरण किंवा कमी केल्यास त्याचा कोणताही परिणाम प्राधिकरणावर होणार नाही आणि प्राधिकरणाचे अधिकार आणि भाग हिस्सा यावर कोणताही परिणाम किंवा बदल होणार नाही.

१६.५. सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५०४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई), (ग) व (ल) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, मुंबई मेट्रो मार्ग- १ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) कर्जदात्यांसाठी मुंबई मेट्रो वन प्रा.लि. द्वारा प्रस्तावित कर्ज निवारण योजनेच्या मंजूरीकरीता खालील नमूद ९ अटींना मान्यता देत आहे :-

१. मुं.म.प्र.वि.प्राधिकरण किंवा महाराष्ट्र सरकारकडून कुठलाही अतिरिक्त निधी देणार नाही.

२. मुं.म.प्र.वि.प्राधिकरण किंवा महाराष्ट्र सरकारकडून कुठलीही अतिरिक्त हमी देणार नाही.

३. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ने कर्ज निराकरण योजना मंजूर करताना कोणत्याही संस्थेस अथवा व्यक्तीस कर्ज रोखे, प्राधान्य समभाग अदा केल्यास प्राधिकरणाच्या समभाग रचनेत समभाग २६% च राहील याकरीता प्राधिकरण कोण्यत्याही प्रकारचे अतिरिक्त अंशदान देणार नाही. तसेच प्राधिकरणाच्या मतदानाचा अधिकारात कोणताही बदल होणार नाही.

४. मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे सवलत करार (Concession Agreement), भागधारक करार (Share Holding Agreement), संघटनेचा करार (Articals of Association) आणि सर्व संबंधित कागदपत्रांनुसार असलेले सकारात्मक अधिकार (Affirmative Rights) आणि इतर सर्व अधिकार अप्रभावित राहतील आणि कोणत्याही प्रकारे कमी केले जाणार नाहीत.

५. या निराकरण योजनेसाठी कोणताही खर्च, परिणाम, कर्तव्यात चूक आणि इतर कोणत्याही उत्तरदायित्वासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण आणि राज्य शासन जबाबदार राहणार नाही. तसेच याकरिता त्रि-पक्ष/प्रवर्तक/मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ला कोणत्याही प्रकारे बँक कर्ज, बाहय व्यावसायिक कर्ज (ECB), ICDs, क्रेडिटर्स (Capex or Others) किंवा इतर दुय्यम कर्ज (Subordinated Debt), प्राधान्य भागधारक (Preference Share Holders), इतर समभाग (Other Equity) किंवा इतर कोणत्याही प्रकारचे दायित्व यासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

६. मुंबई मेट्रो वन प्रा.लि. बोर्डाच्या ठरावात आणि पत्रामध्ये कंपनीद्वारे घेतलेल्या कर्जाची परतफेडीचे विवरण पत्राचा समावेश नाही. रुपये मुदत कर्ज (RTL) आणि बाह्य व्यावसायिक कर्ज (ECB) यांची सन २०३८ पर्यंत संपूर्ण कर्जांच्या रक्कमेची परतफेड निश्चित केलेली आहे. परंतु, रक्कम परतीच्या वेळेची अनुसूची (Schedule of Payment) दिलेली नाही, ती मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ च्या पत्राद्वारे सादर केलेली आहे. कर्जाच्या निराकरण योजनेला (Debt Resolution Plan) मंजूरी देण्याकरिता परतफेड अनुसूची (Repayment Schedule) ठरावाचा भाग होणे आवश्यक आहे.

७. प्रस्तावामध्ये रुपये मुदत कर्ज (RTL) आणि बाहय व्यावसायिक कर्ज (ECB) व्याजाची जेव्हा देय होईल तेव्हा त्याची परतफेड करण्यात येईल असे नमूद केले आहे. दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बोर्ड मिटिंग मध्ये दिलेल्या माहितीनुसार कंपनीसाठी कर्ज सेवा दायित्व (Debt Service obligation) मार्च, २०१८ पासून प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत मासिक व्याज न भरण्यासंदर्भातील अटी महत्वाच्या ठरतात. याकरिता Corporate Guarantee आणि CRPS वर Redemption Premium न भरल्यास त्याचा मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या Share Holding वर प्रतिकूलरित्या प्रभाव पडणार नाही किंवा मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो वन प्रा.लि. वर असणाऱ्या अधिकारावर प्रभाव होणार नाही. तसेच मुंबई मेट्रो वन प्रा. लि. ला आणखी कोणत्याही निधीची भरपाई, देय खर्च देण्यासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

८. प्रस्तावित Compulsory Redeemed Preference Shares (CRPS) वर देय लांभाश व्याज दराचा उल्लेख नाही. यापूर्वी प्रस्तावित केल्यानुसार, २ वर्षांच्या कालावधीसाठी लाभांश (Dividend) परतफेड करणे गरजेचे असून तसे न केल्यास प्राधान्य भागधारकांना (Preference Share Holders) सहभाग अधिकार आणि कंपनीच्या सर्वसाधारण बैठकीच्या ठरावांवर मत देण्याचे अधिकार प्राप्त होऊ शकतात. मुंबई वन प्रा. लि. द्वारे Redemption Premium चे न भरलेल्या रक्कमेमुळे CRPS धारकांना समभाग धारक होण्यासाठी किंवा मुंबई मेट्रो वन प्रा. लि.

मधील मतदानाचे अधिकार मिळणार नाहीत. ही बाब मुंबई मेट्रो वन प्रा. लि. मंडळाद्वारे पुनर्रचना प्रस्तावास (Restructuring Proposal) मंजूरी देण्यासाठी आणि मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या समाधानासाठी आवश्यक आहे.

९. कर्ज निराकरण योजना आणि त्याबाबतचा करार करतांना प्रवर्तकाने अतिरिक्त निधी भरल्यास किंवा भाग भांडवलाचे हस्तांतरण किंवा कमी केल्यास त्याचा कोणताही परिणाम प्राधिकरणावर होणार नाही आणि प्राधिकरणाचे अधिकार आणि भाग हिस्सा यावर कोणताही परिणाम किंवा बदल होणार नाही.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ : बॅकबे रिक्लेमेशन स्किमच्या ब्लॉक-III ते IV च्या मंजूर विकास आराखड्यामध्ये जमीन वापराच्या आरक्षणात MR & TP Act, १९६६ च्या कलम ३७ अन्वयेच्या प्रक्रियेस सुरुवात करुन खालीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता मिळणेबाबत :-**

**१) भूखंड क्र.११९-'अ' चे "शाळा" (School) हे आरक्षण "वाहनतळ" (Parking) असे बदल करण्याबाबत**

**२) भूखंड क्र.१०५ चे "वाहनतळ" (Parking) हे आरक्षण "शाळा" (School) असे बदल करण्याबाबत**

**३) बे व्हिव्यू मरिना गार्डन या भूखंडांमधून अंदाजे २५०० चौ.मी. विभाजीत करुन प्ले ग्राऊंडसाठी आरक्षित करण्याबाबत**

१७.१. महानगर आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) (सी) नुसार अधिसूचना क्र.बीबीआर/१०८२/सीआर/१४०/१६८७/नवि-११, दिनांक १५ जून, १९८३ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास बॅकबे रिक्लेमेशन स्कीम मधील ब्लॉक क्र.III ते VI यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे. प्राधिकरणाने बी.बी.आर.एस.साठी सादर केलेल्या विकास आरखड्यास शासनाने दिनांक ०३ सप्टेंबर, २००० व १७ मार्च, २००१ रोजी मान्यता दिली.

१७.२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी भूखंड क्र.११९-अ हा शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड हा विद्यमान झोपडपट्टीपासून दूर आहे व सदर परिसर गजबजलेला व वाहतूक वर्दळ असल्यामुळे वाहतूक कोंडी प्रचंड प्रमाणात होते. तसेच

भूखंड क्र.१०५ हा पार्किंगसाठी आरक्षित असून, तो विद्यमान झोपडपट्टीपासून जवळ आहे. त्यामुळे भूखंड क्र.११९-अ चे शाळा हे आरक्षण बदलून पार्किंग करावे व भूखंड क्र.१०५ हा पार्किंगसाठी आरक्षीत असलेला भूखंडाचे शाळा असे आरक्षण बदलाची विनंती केली असून प्रस्तावित शाळेसाठी लागणारे प्ले ग्राऊंड जवळील बे व्हयू मरींना गार्डन हया भूखंडामधून सुमारे २५०० चौ. मी. राखीव करण्याची विनंती केली असून, सदर विनंतीस जिल्हाधिकारी यांनी सदर जमिनीचे मालक ह्यांना त्याने आपले ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. तसेच पोलिस निरीक्षक यांनीही प्रस्तावित बदलास आपले ना हरकत कळविले आहे.

१७.३. महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.५ मध्ये संबंधित भूखंडाची सद्य:स्थितीबाबत खालील प्रमाणे माहिती दिली :-

**(i) भूखंड क्र. ११९ -'अ':**

बॅकबे रिक्लेमेशन योजनेच्या मंजूर विकास आराखडयानुसार भूखंड क्र.११९-अ "शाळेसाठी" (School) आरक्षित आहे. तसेच सदर भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेला जिल्हाधिकारी यांनी भाडेपट्टयावर दिला आहे आणि सदर भूखंडाच्या मिळकत पत्रिकेनुसार) त्याचे क्षेत्रफळ २,८६८.३९ चौ.मी. आहे.

**(ii) भूखंड क्र. १०५:**

बॅकबे रिक्लेमेशन योजनेच्या मंजूर विकास आराखडयानुसार भूखंड क्र.१०५ हा "वाहनतळासाठी" (Parking) आरक्षित आहे. तसेच सदर भूखंड जिल्हाधिकारी यांच्या मालकी हक्काचा असून, तो या प्राधिकरणास संरक्षणाकरीता ताब्यात दिला असून, सदर भूखंड हा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांस तात्पुरत्या स्वरुपात वापर करण्याकरीता दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिला आहे. सदर भूखंडाच्या ताबा पावतीनुसार त्याचे क्षेत्रफळ सुमारे २,१५५.०० चौ.मी. आहे.

**(iii) बे व्हीव्यू मरिना गार्डन :**

बॅकबे रिक्लेमेशन योजनेच्या मंजूर विकास आराखडयानुसार बे व्हीव्यू मरिना गार्डन हा भूखंड गार्डन तसेच प्ले ग्राऊंड यासाठी आरक्षित आहे. तसेच सदर भूखंड जिल्हाधिकारी यांच्या मालकी हक्काचा असून तो कफ परेड रेसिडेन्ट्स असोसिएशन यांना तात्पुरत्या स्वरुपात संरक्षणाकरीता ताब्यात दिला आहे आणि सदर भूखंडाचे क्षेत्रफळ अंदाजे ३०,००० चौ.मी. आहे.

महानगर आयुक्त यांनी माहिती देताना असे स्पष्ट केले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेची विनंती लक्षात घेता, तसेच नियोजनाचे दृष्टीकोनातून सदर

आरक्षणात बदल करावयाचा झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे गरजेचे आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, संदर्भिय भूखंड हे केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल विभागाच्या तटीय क्षेत्र विनियम अधिनियमाच्या (CRZ Notification) तरतूदीनुसार बाधित होत असून, दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या मंजूर व दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी प्रकाशित झालेल्या बृहन्मुंबईच्या तटीय क्षेत्र व्यवस्थापन आराखडयात (Coastal Zone Management Plan) दर्शविल्यानुसार सीआरझेड-२ मध्ये समाविष्ट होतो. त्यानुसार या भूखंडांवर जमिन वापर बदलण्याकरीता केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच मेट्रो लाईन-३ हे स्टेशन जवळ येणार असून, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (MMRCL) चे अभिप्राय घेणे गरजेचे आहे. तसेच सदर भूखंडांच्या संदर्भातील न्यायालयीन प्रकरणामध्ये निर्णयाच्या अधिन राहून बीबीआरएसच्या मंजूर विकास आराखडयास सदर आरक्षणात बदल करावयाचा झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

१७.४. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५०५ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम १ चे पोटकलम (क) व ७(अ) मधील अधिकारांचा व त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून बॅकबे रिक्लेमेशनच्या मंजूर विकास आराखडयामध्ये दर्शविलेल्या जमिन वापराच्या आरक्षणात खालीलप्रमाणे बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये बदलाची प्रक्रिया प्राधिकरणाद्वारे सुरु करण्यास मान्यता देत आहे :

i. बॅकबे रिक्लेमेशनच्या मंजूर विकास आराखडयामध्ये दर्शविलेल्या भूखंड क्र.११९-'अ' चे "शाळा" (School) हे आरक्षण बदलून "वाहनतळ" (Parking) करणे तसेच;

ii. बॅकबे रिक्लेमेशनच्या मंजूर विकास आराखडयामध्ये दर्शविलेल्या भूखंड क्र.१०५ चे “वाहनतळ” (Parking) हे आरक्षण बदलून “शाळा” (School) करणे तसेच,

iii. सदर प्रस्तावित भूखंड क्र.१०५ च्या शाळेसाठी लागणाऱ्या प्ले ग्राऊंडसाठी अंदाजे २,५०० चौ.मी. हे जवळच्या बे व्हु मरिना गार्डन या भूखंडामधून विभाजीत करुन शाळेसाठी लागणाऱ्या प्ले ग्राऊंडसाठी आरक्षित करणे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** संदर्भिय भूखंडांच्या बाबतच्या भाडेपट्टा करारातील अटी व शर्तींच्या अधीन राहून वरील भूखंडाचे क्रमांक, क्षेत्र, मालकी हक्क, जागेवर सिमांकन हे जिल्हाधिकारी, मुंबई जिल्हा यांच्या पडताळणीस अधीन राहून तसेच या भूखंडाच्या संदर्भात न्यायालयीन प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून वरील आरक्षण बदलण्यास मान्यता देण्यात येत आहे.

“**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या तरतूदीनुसार नोटीस प्रसिद्ध करणे, जनतेकडून सूचना/हरकती मागविणे, नियोजन समिती नियुक्त करणे व नियोजन समितीचा अहवाल शासनास सादर करणे व हे आरक्षण बदल करण्यासाठी व इतर आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.”

**बाब क्र.१८ : कांजूरमार्ग ते बदलापूर व छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मार्गांकरीता योग्य जलद परिवहन सेवेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास तत्वत: मान्यता मिळण्याबाबत**

१८.१. कांजुरमार्ग ते बदलापूर व छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मार्गांकरीता योग्य जलद परिवहन सेवा या प्रस्तावावर सविस्तर सादरीकरणाची माहिती देताना, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याची गरज पाहता इतर संभाव्य महसुलाची स्त्रोतामधुन तसेच इतर पर्याय जसे की, सार्वजनिक-खाजगी-भागीदारी (PPP) किंवा स्वीस चॅलेंज (Swiss Challenge) मार्गदर्शक तत्वावर संबंधीत प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता भासत आहे.

१८.२. महानगर आयुक्तांनी अशीही माहिती दिली की, प्राधिकरणास वेगवेगळया संस्थेमार्फत संबंधित प्रकल्प सार्वजनिक-खाजगी-भागीदारी (PPP) किंवा स्वीस चॅलेंज (Swiss Challenge)

..३८/-

मार्गदर्शक तत्वावर M/s.LASANE Infra व M/s.Swiss Rapid A.G. Switzerland यांच्या मार्फत मॅगलेव्ह रेल्वे प्रणालीची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे विविध प्रस्ताव प्राप्त होत आहेत. सदर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यासाठी निश्चित धोरण तयार करण्याची गरज आहे.

१८.३. सदर मेट्रो मार्गाबद्दल सविस्तर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विविध संस्थेमार्फत पायाभूत प्रकल्प अंमलबजावणीसाठी दाखविली जाणारी उत्सुकता तसेच, प्राधिकरणाकडे सद्य:स्थितीस असणारी निधीची कमतरता पाहता प्राधिकरण कांजुरमार्ग ते बदलापूर आणि छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मार्गांसाठी सार्वजनिक-खाजगी-भागीदारी (PPP) किंवा स्वीस चॅलेंज (Swiss Challenge) मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबजावणी करण्याचे विचाराधीन आहे. सदर दोन्हीं मार्गावर दैनंदिन प्रवासी संख्या ही मोठया प्रमाणात अपेक्षित असून सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या अद्यावतीकरणामध्ये देखील या दोन्हीं मार्गांचा प्राधान्यक्रमाने समावेश आहे.

१८.४. महानगर आयुक्त यांनी कांजुरमार्ग ते बदलापूर या मार्गाबद्दलची माहिती देताना असे सांगितले की, कांजुरमार्ग ते बदलापूर या उन्नत मार्गाची एकूण लांबी ४४.७ कि. मी. असून, सदर मार्गिकेवर सन २०४१ मध्ये सुमारे ९.९५ लाख दैनंदिनी प्रवाशी अपेक्षित आहेत. या मार्गासाठी मेट्रो आगार बदलापूर येथे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर मार्गामुळे मुंबई पश्चिम उपनगर हे बदलापूर परिसरास जोडण्यात येईल. तसेच सदर मार्ग हा उल्हासनगर मार्गे प्रस्तावित असल्याची माहिती दिली.

१८.५. तसेच पुढे महानगर आयुक्त यांनी छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मार्गाबद्दलची माहिती देताना असे सांगितले की, या मार्गाची लांबी ३३.१५ कि.मी. असून सदर मार्गिकेवर सन २०४१ मध्ये सुमारे ८.७३ लाख दैनंदिनी प्रवासी अपेक्षित आहेत. सदर मार्गिकेमुळे छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ योग्य जलद परिवहन सेवेने जोडण्यात येईल.

१८.६. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर मार्गाचा कोणत्या शहरांना फायदा होणार असून दैनंदिन प्रवासी संख्या बाबत विचारणा केली. यावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर मार्गिकेमुळे पनवेल, घनसोली, वाशी इ. या परिसरातील नागरिकांना फायदा होणार असून मोठ्या प्रमाणात दैनंदिन प्रवासी संख्या अपेक्षित आहे.

१८.७. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी पुणे शहरात सार्वजनिक-खाजगी-भागीदारी (PPP) तत्वावर अंमलबजावणी होत असलेल्या मेट्रो प्रकल्पाची माहिती देताना अशाच माध्यमातून प्रकल्प उभारले जावेत असे सांगितले. यावर माहिती देताना, महानगर आयुक्त यांनी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नाविन्यपूर्ण वित्तीय रचनांचा (Innovative Finance Model) जसे की, स्थापत्य कामाचा खर्च प्राधिकरणामार्फत आणि प्रणाली, कार्य व देखभालीसाठी बाह्य संस्थेमार्फत (PPP) उपलब्ध करणे इ. बाबत अभ्यास करण्यात येत आहे, तसेच सदर वित्तीय रचना ही केंद्र शासनाच्या मेट्रो धोरणास अनुसरुन असेल अशी माहिती दिली.

१८.८. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५०६ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ चे उपकलम (१) चे पोट कलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे कांजुरमार्ग ते बदलापूर व छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या दोन्हीं मार्गांसाठी योग्य जलद परिवहन सेवेसाठी **सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) किंवा स्वीस चॅलेंज (Swiss Challenge) मार्गदर्शक तत्वानुसार** सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

******

**जोडपत्र**

**जोडपत्र**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १४७वी बैठक**

**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१९**

**: ठराव :**

"श्री. अरूण बोंगीरवार, शासनाचे माजी मुख्य सचिव व सदस्य, प्राधिकरण यांचे दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी निधन झाले. श्री. बोंगीरवार हे दिनांक २५.०५.१९९९ ते २३.०१.२००१ या कालावधीत शासनाचे मुख्य सचिव या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री. बोंगीरवार यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दु:खद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री. बोंगीरवार यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दु:खात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********